जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४३४ दिनांक - १३/१०/२०२४**

युनिट ३ गुन्हे शाखा,पुणे शहर

**गुन्हे शाखा, युनिट ३ ने गहाळ झालेले १० मोबाईल किं.रू.१,३०,०००/- चे शोधून नागरीकांना परत केले.**

सन २०२३ व सन २०२४ मध्ये सीईआयआर पोर्टल वरून परिमंडळ ३ कार्यक्षेत्रातील नागरीकांचे गहाळ झालेल्या मोबाईल फोन पैकी काही मोबाईल चालू असलेबाबतची माहिती युनिट ३ गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस हवा.संजीव कळंबे यांनी घेवून सदर मोबाईल हे सध्या कोठे सुरू आहेत याबाबतची माहिती प्राप्त करून घेतली. असे एकुण १० मोबाईल चालू असलेबाबत त्यांना समजल्याने सदर मोबाईल धारकाचा शोध घेवून सदरचे मोबाईल हे सोलापूर,सांगली व पुणे जिल्हयातुन प्राप्त करण्यात आले आहेत.

सदरचे प्राप्त करण्यात आलेले किं.रू.१,३०,०००/-चे एकुण १० मोबाईल हॅन्डसेटचे मुळ मालक शोधून त्यांना सदरचे मोबाईल हॅन्डसेट हे परत देण्यात आलेले आहेत.त्यामध्ये सिंहगड रोड पोलीस ठाण्याकडील ०६ मोबाईल हॅन्डसेट, पर्वती पोलीस ठाणे,अलंकार पोलीस ठाणे,कोथरूड पोलीस ठाणे,वारजे पोलीस ठाणे कडील प्रत्येकी ०१ मोबाईल हॅन्डसेट गहाळ झालेले मिळून आले आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह-आयुक्त,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे श्री.निखील पिंगळे, मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे १,श्री.गणेश इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,युनिट ३ गुन्हे शाखा चे प्रभारी अधिकारी,श्री.रंगराव पवार, पोलीस अंमलदार संजीव कळंबे, विनोद भंडलकर, ज्ञानेश्वर चित्ते, इसाक पठाण व सुजित पवार यांचे पथकाने केली आहे.


पुणे शहर
गुन्हे शाखा
युनिट-३
कार्यालय